महाराष्ट्र शासन

क्र. बीएड मान्यता २००६/(४१४/०६)/मशि-१,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०००३२.
दिनांक : २२ सप्टेंबर, २००६.

प्रति,
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

विषय:- अध्यापक महाविद्यालय सुरू करण्यास मान्यता देणेबाबत

संदर्भ:- सिव्हील अपील क्र.१८५९/२००६ व १८६०/२००६ अरायजिंग आऊट ऑफ एस.एल.पी.(सिव्हील) क्र.२०९१८/२००५ व एसएलपी(सी) २०९६९-२०९७७/२००५ वरील मा.सर्वोच्च न्यायालयाचे दि.३१ मार्च, २००६ चे आदेश,

महोदय,

एन.सी.टी.ई., भोपाळ यांनी दिलेल्या परवानगीनुसार व त्यांच्या पत्रातील अटीनुसार शैक्षणिक वर्ष २००६-०७ पासून खालील संस्थांना कायम विना अनुदान तत्वावर अध्यापक महाविद्यालय सुरू करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | संस्थेचे नांव/महाविदयालयाचे नांव | अभ्यासक्रमाचे नांव | प्रवेश क्षमता | शैक्षणिक वर्षे | एन.सी.टी.ईच्या परवानगीच्या पत्राचा क्रमांक दिनांक व कोड क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| १. | बाळासाहेब माने एज्युकेशन ट्रस्ट, मु.पो. रुकाडी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर ४१६११८ | बी.एड. | १०० | २००६-०७ | WRC/५-६/ ८६-८७/ २००६/८०६९ दि. ३१/८/२००६ APW००५८७/१२३१२१ |

एन.सी.टी.ई., भोपाळ यांच्या मान्यतेच्या पत्राची खातरजमा विद्यापीठाने करणे आवश्यक राहील. तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाच्या संदर्भाधीन निर्णयाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली पुढील कार्यवाही करून त्याचा अहवाल शासनास सादर करावा.

हे शासन पत्र शासनाचे संकेतस्थळ www.maharashtra.gov.in या उपलब्ध असून त्याचा संगणकीय सांकेतांक क्र.२००६०९२२१४५७५७००१ असा आहे.

आपला,
(सु. बा. तुंबारे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर
३. विभागीय संचालक, राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद, मानस भवन, श्यामला हिल्स, भोपाळ-४०६२००६.
४. संबंधित संस्था,
५. निवड नस्ती/मशि-१.

C:\My Documents\cc1\B.Ed\G.R\KINKAR.doc

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
४ था मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दुरध्वनी क्र. -०२२-२२७९३१७१ ई-मेल –amol.ugalmugale@gov.in

क्रमांक : बीएड ४६२१/प्र.क्र.१९९/मशि-२, दिनांक: २२ डिसेंबर, २०२१

प्रति,
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर.

**विषय :-** कायम विनाअनुदानित शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमांस शासनाचे सुधारीत ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत.
**(महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय, कोल्हापूर)**

**संदर्भ:-**(१) शासनपत्र क्रमांक :बीएड-४६१५/प्र.क्र.३३२(३)/मशि-२, दि.११.०७.२०१६.
(२)शासनपत्र क्रमांक:बीएड-४६१५/प्र.क्र.३३२(३)/मशि-२, दि.२७.०७.२०१७.
(३) शासनपत्र क्रमांक:बीएड-४६१५/प्र.क्र.३३२(३)/मशि-२ दि.१२.०७.२०१८.
(४) शासनपत्र क्रमांक:बीएड-४६१९/प्र.क्र.१२१(१)/मशि-२ दि.१२.०७.२०१९.
(५) शासनपत्र क्रमांक बीएड-४६२०/प्र.क्र. ९१(२)/मशि-२, दि. २१.१०.२०२०.
(६) शासनपत्र क्रमांक बीएड ४६२१/प्र.क्र.१९९/मशि-२, दि. २२/११/२०२१
(७) संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे पत्र क्र.बी.एङ-२५२१/प्र.क्र.६२२/ सीईटीसेल/१४२५५, दि. १४/१२/२०२१.

उपरोक्त विषयासंबंधीच्या संदर्भाधीन क्र. ७ येथील पत्रान्वये, संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी शिफारस केलेल्या, **बाळासाहेब माने एज्युकेशन ट्रस्ट संचलीत महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय, मार्केट यार्ड, कोल्हापूर** या कायम विनाअनुदानित **शिक्षणशास्त्र** अभ्यासक्रम महाविद्यालयास खालील अटींच्या अधीन राहून शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता राज्य शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येत आहे :-

(क) राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषदेने **शिक्षणशास्त्र** अभ्यासक्रमास मान्यता दिली आहे, शासनाने सदर अभ्यासक्रमांस यापूर्वी ना-हरकत प्रमाणपत्र दिले आहे, तसेच संबंधित विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०२१-२२ साठी संलग्निकरण दिलेले आहे, याची खातरजमा संचालक, उच्च शिक्षण यांनी प्रवेश प्रक्रियेकरिता महाविद्यालयांची नोंदणी करताना करावी.

(ख) राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषदेच्या नियमाप्रमाणे सदर अभ्यासक्रमांचे विहित दिवस पूर्ण होतील याची खात्री करुन विद्यापीठाने संलग्निकरण प्रदान करावे.

(ग) अल्पसंख्यांक महाविद्यालयांच्या बाबतीत **बी.एड** या अभ्यासक्रमांस प्रवेश देताना अल्पसंख्यांक विकास विभागाच्या शासन निर्णय क्र.अशैसं-२०१२/प्र.क्र.२१/कार्या-५, दि.२३.०५.२०१३ च्या भाग-अ मधील क्र.१० (ब) व (क) मध्ये विहित केलेल्या तरतुदीनुसार अल्पसंख्यांक/बिगर अल्पसंख्यांक कोटयाचे कटाक्षाने अनुपालन करणे बंधनकारक राहील. अन्यथा भाग-ब मधील क्र.७ नुसार कारवाई करण्यासाठी शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे व संबंधित सहसंचालक, उच्च शिक्षण हे सक्षम प्राधिकरणाकडे शिफारस करण्याची कार्यवाही करतील.

(घ) विभागीय सहसंचालक, कोल्हापूर यांनी **शिक्षणशास्त्र** महाविद्यालयांच्या तपासणी दरम्यान निदर्शनास आलेल्या त्रुटींची व राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषदेने विहित केलेल्या सुधारित निकषांची पूर्तता करण्यात आल्याची खातरजमा करण्याची जबाबदारी विद्यापीठाची राहील.

(ङ) सदर महाविद्यालयाकडून सदर त्रुटींची व सुधारित निकषांची पूर्तता करण्यात न आल्यास सदर महाविद्यालयाचे नाव राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषदेला कळविण्यात यावे. तसेच, शैक्षणिक वर्ष २०२२-२३ च्या प्रवेश प्रक्रियेत सहभागी होण्यास राज्य शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येणार नाही, ही बाब महाविद्यालयाच्या निदर्शनास आणण्यात यावी.

(च) राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषदेच्या सुधारित निकषांची पूर्तता न केल्याच्या कारणास्तव एन.सी.टी.ई. ने महाविद्यालयाची मान्यता रद्द केल्यास, राज्य शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र आपोआप रद्द समजण्यात येईल.

दत्तात्रय कहार

**( दत्तात्रय कहार )**

**सह सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रत,

(१) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,

(२) विभागीय सहसंचालक कोल्हापूर, उच्च शिक्षण, (संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे मार्फत)

(३) बाळासाहेब माने एज्युकेशन ट्रस्ट संचलीत महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय, मार्केट यार्ड, कोल्हापूर

(४) निवड नस्ती (मशि-२)